**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**शाखा कार्यालय, वर्धा**

**PH 07152-242639**
**E-Mail** townplanner1wardha@rediffmail.com

जिल्हा क्रीडा संकुल, डॉ. आंबेडकर चौक,
सिव्हील लाईस, वर्धा-442001

जा.क्र. अकृषक/ मौजा बोरगाव(मेघे)/ता.वर्धा/स.क्र.98/1/नरव/ 1017

दिनांक :- 23/05/2018

प्रति,
**उपविभागीय अधिकारी,**
**वर्धा.**

**विषय :- अकृषक परवानगी - नाहरकत /अभिप्राय सादर करण्याबाबत.**
मौजा बोरगाव (मेघे) स.क्र.98/1 आराजी 2.80 हे.आर जमीन निवासी प्रयोजनार्थ **अकृषक करणेबाबत.**

**संदर्भ :-** 1) आपले पत्र क्र.सिर/अकृषक/उविअ/कावि-700/18 दि.19/04/2018
2) या कार्यालयाचे पत्र क्र. अकृषक/मौजा बोरगाव (मे)/ता.वर्धा/स.क्र.98/1/नरव/909 दि.08/05/2018
3) आवेदक यांचा या कार्यालयास दि.08/05/2018 रोजीचा अर्ज
4) या कार्यालयाचे विभागीय कार्यालयास पत्र क्र.मार्गदर्शन/अकृषक/मौ.बोरगाव(मे)/स.क्र.98/1/नरव/932 दि.11/05/2018
5) मा.सहसंचालक नगर रचना नागपुर विभाग नागपूर यांचे या कार्यालयास पत्र क्र. पत्र क्र.मार्गदर्शन/अकृषक/ मौ.बोरगाव(मे)/स.क्र.98/1/सहसंचानाग/747 दि.17/05/2018

विषयांकित अकृषिक प्रकरणी संदर्भिय पत्र क्र.1 अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक करणेबाबत या कार्यालयाचे अभिप्राय अपेक्षिले असता संदर्भित पत्र क्र. 2 अन्वये त्रृटया कळविण्यात आलेल्या आहेत. तदनंतर संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये आवेदकाने अर्ज सादर केला असता संदर्भित पत्र क्र.4 अन्वये वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. संदर्भित पत्र क्र. 5 अन्वये सदर प्रकरणी मार्गदर्शन प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने छाननी करुन खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

शासनाचे दि. 10/02/2010 चे निर्देशानुसार विषयांकित जागेचे जमीन धारकांनी अभिन्यास छाननी शुल्क रू.3500/- (रू. तीन हजार पाचशे फक्त) शासकिय खजिन्यात चलान क्र.823058, दि. 23/04/2018 छाननी शुल्क रोजी जमा केले आहे. वर्धा प्रदेशा करीता प्रादेशिक योजना मंजुर झालेली असल्याने त्यामधील विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदी नुसार उक्त प्रकरणी भुखंडावरील क्षेत्रावर विकास शुल्क रक्कम रु.208500/- ( अक्षरी दोन लक्ष आठ हजार पाचशे रुपये फक्त ) शासकीय खजीन्यात चलान क्र. 1830917 दि. 23/05/2018 अन्वये भरणा केलेला आहे. प्रकरणासह प्राप्त अभिन्यास नकाशे सर्वसाधारणपणे योग्य असल्याने किरकोळ दुरुस्ती लाल रंगाने दर्शवुन सदर अभिन्यासाची खालील अटिवर सिमांकनाची **(Recommended for Demarcation)** शिफारस करण्यात येत आहे.

1) मा.सहसंचालक,नगर रचना,नागपुर विभाग नागपुर यांचे पत्र क्र.पत्र क्र.मार्गदर्शन/अकृषक/मौ.बोरगाव(मे)/स.क्र.98/1/ सहसंचानाग/747 दि.17/05/2018 अन्वये सदर प्रकरणी मार्गदर्शन प्राप्त झाले असुन सदर पत्रातील सर्व अटी बंधनकारक राहतील.
2) सदर अभिन्यासामध्ये प्रस्तावित सुविधा क्षेत्र हे कायम स्वरुपी खुल्या वापराच्या प्रयोजनार्थ राखीव ठेवने बंधनकारक राहील.त्यामध्ये कोणतेही बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही.
3) प्रस्तावित रेखांकनाबाबत वर्धा जिल्ह्यातील विद्युत निरीक्षकाचे जमीन वापर सुरक्षेबाबत मंडळाकडील नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.
4) शासनाकडील निदेशाचे अनुषंगाने प्रचलीत नियमावली तरतुदी नुसार विकास शुल्काचा भरणा संबधित नियोजन प्राधिकरणाकडे करणे अर्जदारास/विकासकास बंधनकारक राहील.

Scanned by CamScanner